09 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकपरंपरेतील स्त्रीविद्रोहाच्या पुनर्वाचनाची गरज

## डॉ. तारा भवाळकर; शिवाजी विद्यापीठात 'सीतायन'वर मुक्त संवाद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा हुंकार लोकपरंपरेतील आविष्कारातून दिसत राहतो. लोकपरंपरेतील स्त्रीविद्रोहाचे पुनर्वाचन गरजेचे आहे, असे प्रतिपादन लेखिका डॉ. तारा भवाळकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि मराठी विभागातर्फे आयोजित 'सीतायन' या पुस्तकावरील मुक्त संवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या वेळी डॉ. मेघा पानसरे, डॉ. मुकुंद कुळे उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरूवारी 'सीतायन' पुस्तकावरील मुक्त संवादात प्रा. डॉ. तारा भवाळकर यांनी विचार मांडले. या वेळी डावीकडून डॉ. नंदकुमार मोरे, मुकुंद कुळे, मेघा पानसरे, भारती पाटील उपस्थित होत्या.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, "लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास केला, तर देशाच्या सांस्कृतिक इतिहासाचे पुनर्लेखन करून तो बदलावा लागेल." डॉ. कुळे यांनी सीतायन या पुस्तकामध्ये आलेल्या लोकपरंपरेतील सीतेच्या चित्रणाचा वेध घेतला. भवाळकर यांनी लोकसंस्कृतीविषयक मोलाचे काम केले असून सीतायनमध्ये ताराबाई मोडक आणि लोकपरंपरेतील सीता मांडली आहे. त्यांच्या सृष्टीत रामायणाची चिकित्सा आहे. बहुसंख्यांचा राम अन्वयार्थ त्यात असल्याचे डॉ. कुळे यांनी सांगितले.

डॉ. पानसरे यांनी सीता आणि सीतेने केलेले बंड हे आधुनिक स्त्री मुक्तीसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे, असे मत व्यक्त केले. भवाळकर यांचा सीता अन्वयार्थ हा आजचा संदर्भात समजून घ्यायला हवा. सीताकथेत स्त्रियांच्या जगाची वेगळी बाजू आहे. तसेच लोकपरंपरा आणि मातृसंस्कृतीची जाण या स्त्री गीतात असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास प्रा. किसनराव कुराडे, दशरथ पारेकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, माया पंडित, रणधीर शिंदे, अविनाश सप्रे उपस्थित होते. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 FEB 2024
लोकमत

# लोकपरंपरेतील स्त्रीविद्रोहाचे पुनर्वाचन गरजेचे : भवाळकर

## 'सीतायन' पुस्तकावर मुक्त संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : लोकपरंपरेतील स्त्रीविद्रोहाचे पुनर्वाचन गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. तारा भवाळकर यांनी केले. त्या शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि मराठी विभाग यांच्या वतीने 'सीतायन' या पुस्तकावरील मुक्त संवाद कार्यक्रमात बोलत होत्या.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा हुंकार लोकपरंपरेतील आविष्कारातून दिसत राहतो. लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास केला तर देशाच्या सांस्कृतिक इतिहासाचे पुनर्लेखन करून तो बदलावा लागेल. यावेळी डॉ. मेघा पानसरे यांनी सीता आणि सीतेने केलेले बंड हे आधुनिक स्त्रीमुक्तीसाठी मार्गदर्शक ठरणारे असल्याचे सांगितले. डॉ. मुकुंद कुळे यांनी या पुस्तकामध्ये आलेल्या लोकपरंपरेतील सीतेच्या चित्रणाचा वेध घेतला.



'सीतायन' या पुस्तकावरील मुक्त संवाद कार्यक्रमात डॉ. तारा भवाळकर यांनी मार्गदर्शन केले.

अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. किसनराव कुराडे, दशरथ पारेकर, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. अविनाश सप्रे, डॉ. माया पंडित, प्रा. सुनीलकुमार लवटे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 FEB 2024
पुढारी

# परीक्षा फॉर्म भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे मार्च-एप्रिल २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे. विद्यापीठाने यापूर्वी परीक्षा फॉर्म भरण्याच्या तारखा जाहीर केल्या आहेत. तरीही काही महाविद्यालयांनी परीक्षा फॉर्म भरण्यास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली होती. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागात परीक्षा अर्ज करण्याची मुदत पुढीलप्रमाणे. त्यानुसार आता १२ फेब्रुवारीपर्यंत विनाविलंब परीक्षा फॉर्म भरता येणार आहेत. दि. १२ ते १६ फेब्रुवारी या काळात फॉर्म भरण्यास विलंब शुल्क ५० रुपये भरावे लागणार आहेत. २१ फेब्रुवारीनंतर साडेतीनशे रुपये अतिविलंब शुल्क भरावे लागणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 FEB 2024

तरुण भारत

# विद्यापीठ मार्च-एप्रिल परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्याचे व परीक्षांचे वेळापत्रक शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले होते. परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा अधिविभागात विनाविलंब शुल्कासह १२ फेब्रुवारीपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह दि. ९ ते १६ दरम्यान तर अतिविलंब शुल्कासह दि.१५ ते २१ फेब्रुवारी दरम्यान परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालय व अधिविभागांनी विनाविलंब शुल्कासह दि.१३, विलंब शुल्कासह दि.१७ आणि अतिविलंब शुल्कासह २२ फेब्रुवारीला परीक्षा अर्ज ॲप्रुव्ह करावयाचा आहे. सर्व परीक्षा अर्जांच्या याद्या विद्यापीठात विनाविलंब शुल्कासह १६ फेब्रुवारी, विलंब शुल्कासह २०, फेब्रुवारी, अतिविलंब शुल्कासह २३ फेब्रुवारीपर्यंत सादर करावयाच्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 FEB 2024
पुढारी

# पन्हाळा अवकाश केंद्रात आज अवकाश निरीक्षणाची संधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये दि. ९ रोजी रात्री ८ ते १२ वा. या कालावधीत अवकाश निरीक्षण आयोजित करण्यात आले आहे. या निरीक्षणांतर्गत निरभ्र आकाशामुळे विविध ग्रह, तारे, तारकासमूह आदी पाहता येऊ शकणार आहेत. इच्छुक विद्यार्थी, नागरिक यांच्यासाठी येथे मुक्त प्रवेश आहे. या संधीचा अवकाशप्रेमी नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 FEB 2024
लोकमत

# पन्हाळा केंद्रात आज अवकाश निरीक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये आज शुक्रवारी रात्री ८ ते १२ या कालावधीत अवकाश निरीक्षण आयोजित केले आहे. या अवकाश निरीक्षणांतर्गत निरभ्र आकाशामुळे विविध ग्रह, तारे, तारकासमूह आदी पाहता येऊ शकणार आहेत. इच्छुक विद्यार्थी, नागरिक यांच्यासाठी येथे मुक्त प्रवेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 FEB 2024
सकाळ

# पन्हाळा अवकाश केंद्रात आज निरीक्षणाची संधी

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये उद्या, शुक्रवारी रात्री ८ ते १२ या वेळेत अवकाश निरीक्षण आयोजित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 FEB 2024

सकाळ

# श्रमदान शिबिराचे वाघवेत आयोजन

पोर्ले तर्फ ठाणे, ता. ८ : आसुर्ले-पोर्ले (ता. पन्हाळा) येथील कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाच्यावतीने वाघवे (ता. पन्हाळा) येथे शिवाजी विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना श्रमदान शिबिर राबविण्यात आले. आठवडाभर चाललेल्या या शिबिरांतर्गत गावात ग्रामस्वच्छता, मोफत डोळे तपासणी शिवाय कृषी तंत्रज्ञान, दुग्ध व्यवसाय, ऊस पाचट व्यवस्थापन, व्यसनमुक्ती या विषयावर विविध तज्ञाचे मार्गदर्शन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेजर अशोक कांबळे होते.

यावेळी प्रमुख वक्ते कृषी अधिकारी बंडोपंत कुंभार आणि प्रशांत वडे यांनी मार्गदर्शन केले. संस्थाध्यक्ष प्राचार्य एन. डी चौगुले, सरपंच प्रदीप पाटील, उपसरपंच उषा कांबळे, संस्था सचिव अलका चौगुले, सहसचिव ए. ए. घाडगे आदींसह ग्रामपंचायत सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, ग्रामस्थ उपस्थित होते.

0 9 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ महिला फुटबॉल संघाला कांस्य



कोल्हापूर : क्रीडा महोत्सव आंतरविद्यापीठ महिला फुटबॉल स्पर्धेत कांस्यपदक पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाचा महिला फुटबॉल संघ.

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : लोणेरे (जि. रायगड) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी येथे झालेल्या क्रीडा महोत्सव आंतर विद्यापीठ महिला फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ महिला फुटबॉल संघाने कांस्यपदक पटकावले.

विद्यापीठ संघाने गट साखळीत नांदेड विद्यापीठ संघाचा १-० ने पराभव केला. सानिका पाटीलने केलेला गोल निर्णायक ठरला. सोनाली साळवी व शर्वरी डोणकरने केलेल्या गोलच्या जोरावर मुंबईच्या एच. एस. एन. सी.ला २-० ने पराभूत केले. उपांत्य सामना अमरावती विद्यापीठाविरुद्ध झाला. सडनडेथवर हा सामना अमरावतीने जिंकला. तिसऱ्या क्रमांकासाठी नागपूर विद्यापीठाविरुद्ध सामना झाला. त्यात शर्वरी डोणकरने केलेल्या एकमेव गोलच्या जोरावर विद्यापीठ संघाने विजय मिळवला. प्रतीक्षा मिठारी, सोनाली सतार, अर्पित पोवार, नीशा पाटील, सानिका चौगले, आरती काटकर, तनुजा चौगुले, भक्ती बिरनगड्डी, स्नेहल घाडगे यांनी उत्कृष्ट खेळ केला.

विजयी संघात सोनाली साळवी (कर्णधार), अर्पिता पोवार (गोलरक्षक), प्रतीक्षा मिठारी, सोनाली सुतार, नीशा पाटील, सानिका पाटील, शर्वरी डोणकर, सानिका चौगुले, आरती काटकर, तनुजा चौगुले, भक्ती बिरनगड्डी, स्नेहल घाडगे, गौरी चव्हाण, शिवानी पाटील, स्नेहल सुतार यांचा समावेश होता. सर्वांना प्रशिक्षक पृथ्वी गायकवाड व व्यवस्थापक प्रा. एन. आर. कांबळे यांचे मार्गदर्शन मिळाले.